रत्नागिरी टाइम्स

गुरुवार, दि. २२ सप्टेंबर २०२२

# दोडामार्ग हळबे महाविद्यालयात व्याख्यान व पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन

दोडामार्ग, २१ सप्टेंबर (प्रतिनिधी) - मुलांच्या निकोप वाढीसाठी उत्तम आहार असणे आवश्यक आहे. यासाठी शासन पातळीवर विविध उपक्रम राबविले जातात. शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य विषयक जनजागृती व्हावी, त्याचे पोषण व्यवस्थित व्हावे म्हणून शासनामार्फत पोषण माह उपक्रम सुरु आहे. या अंतर्गत येथील लक्ष्मीबाई सिताराम हळवे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने एस. बी. आयनोड़कर आरोग्य विस्तार अधिकारी पंचायत समिती दोडामार्ग यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत होते. प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर आरोग्य सेवक अमोल गवस, आरोग्य सहाय्यक श्री गोसावी, एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप बर्वे, डॉ. राजेंद्र इंगळे उपस्थित होते. पोषण आहाराचे महत्व विशद करणाऱ्या पोस्टर प्रदर्शनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमच्या प्रास्ताविकातून डॉ. राजेंद्र इंगळे यांनी कार्यक्रमाचा उद्देश सांगितला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. महिमा गवस हिने तर आभार प्रा. दिलीप बर्वे यांनी मानले.